दै. पुढारी दि. ०९/०८/२०२५



# पोलिस अधीक्षकांच्या यशस्वी कारकीर्दीची वर्षपूर्ती

## समाजातील विविध घटकांतील नागरिकांकडून सत्कार

गणेश कस्तुरे

**नांदेड :** काळ अखंड धावत असतो; पण आपल्या कार्यकर्तृत्वाने काही अधिकारी त्या-त्या ठिकाणी आपल्या कार्याची छाप पाडतात. असाच काहीसा अनुभव नांदेडकरांनी पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्या रुपाने बघितला. गेल्या वर्षभराच्या आपल्या कारकीर्दीत नांदेडकरांची त्यांनी केलेली सेवा आज त्यांच्या कार्यालयात पहावयास मिळाली. सकाळपासून समाजतल्या विविध घटकांपासून होणारा सत्कार त्यांना स्फूर्ती देणारा ठरला.

बिहारमधून अभियांत्रिकी शाखेची पदवी मिळवणाऱ्या अबिनाशकुमार यांनी भारतीय प्रशासकीय सेवेत जाण्याचा मानस ठरवला. काही वर्षांपूर्वीच त्यांची भारतीय पोलिस सेवादलात नियुक्ती झाली. नांदेड येथे अतिरिक्त पोलिस अधीक्षक असताना आपल्या कामाचा कोणताही गाजावाजा न करता त्यांनी आपले कर्तव्य बजावले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन ८ ऑगस्ट २०२४ रोजी त्यांची नांदेड पोलिस अधीक्षक म्हणून नियुक्ती झाली. आपल्या कारकीर्दीत वेगवेगळे उपक्रम राबवून वाळू, अमली पदार्थ, गुटखा, दारू, जुगार चालवणार्या १०२५ जणांविरुद्ध कारवाई करत त्यांनी ६२ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला.



> आपण आपल्या पद्धतीने जास्तीत-जास्त काम करण्याचा प्रयत्न केला. अनेक प्रकरणांत सामान्य नागरिकांची मदत झाली. वर्षभरात कोणत्याही अनुचित घटनेची नोंद झाली नाही, याचा आपल्याला आनंद आहे. त्याचे श्रेय जिल्ह्यातील सर्व अधिकाऱ्यांना आहे. भविष्यात आणखी गतीने काम करण्याचा आपला मानस आहे. नागरिकांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. वाढती लोकसंख्या आणि उपलब्ध मनुष्यबळ लक्षात घेता नागरिकांनी सतर्क राहणे गरजेचे आहे.
>
> - अबिनाशकुमार, पोलिस अधीक्षक, नांदेड

चोरी, घरफोडी, दरोडा अशा प्रकरणांत ८२६ गुन्हे दाखल झाले. त्यात १ कोटी ८४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गुन्हा होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करताना त्यांनी सराईत गुन्हेगारांना हद्दपार केले. शिवाय काही प्रकरणांतील गुन्हेगारांना मोकासारख्या कारवायांना सामोरे जावे लागले.

राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते राहुल गांधी व उपमुख्यमंत्री यांच्यासारख्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या दौर्यावेळी त्यांनी केलेल्या उपक्रमांमुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. राम नवमी, रमजान ईद, गणेशोत्सव यांसारख्या संवेदनशील सणांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी केलेली बंदोबस्ताची आखणी यशस्वी ठरली.

कायदा आणि सुव्यवस्था सांभाळताना 'मिशन निर्भया' अंतर्गत त्यांनी वेगवेगळे ८ उपक्रम सुरू केले. त्यांत 'स्ट्रीट सेफटी पथक', 'खंडणी विरोधी पथक', 'प्रशासकीय कामकाज', 'वाहतूक व्यवस्था', 'सीसीटीव्ही', जिल्ह्यातील काही पोलिस ठाण्यांच्या इमारतींचा प्रश्न मार्गी लावण्यात त्यांना यश आले. गुरुद्वारा परिसरात फेब्रुवारी महिन्यात झालेल्या गोळीबार प्रकरणाचाही तपास त्यांनी सत्त्वर लावला. वर्षभरात २६ मुलींचे अपहर झाले होते. त्यातील सर्व मुलींना सुखरुप त्यांच्या नातेवाईकांपर्यंत पोहोचविण्याची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली. महिला सहाय्य कक्षात १०८५ पैकी १००७ तक्रारींचा निपटारा करण्यात आला.

नांदेड जिल्ह्यात यापूर्वी अनेक अधिकाऱ्यांनी आपल्या कारकीर्दीने नांदेडकरांची मने जिंकली होती. अमिताभ गुप्ता, फत्तेसिंह पाटील, लक्ष्मीकांत पाटील, रवींद्रकुमार सिंघल, मनोज शर्मा यांची कारकीर्द आजही संस्मरणीय आहे. विद्यमान पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आपल्या कारकीर्दीत विविध उपक्रम राबवून नांदेडकरांची मने जिंकली. कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवताना त्यांनी सुक्ष्म नियोजन करून गुन्हेगारांवर नियंत्रण मिळविले. त्यामुळेच अनेक सराईत गुन्हेगार हद्दपार झाले.

प्रसिद्धीचा कोणताही गाजावाजा न करता वेगवेगळ्या उपक्रमांतून पोलिस आणि नागरिक यांचा संवाद कसा वाढेल, याकडे लक्ष देणाऱ्या पोलिस अधीक्षकांचा आज समाजातील सर्व घटकांकडून सत्कार करण्यात आला. सकाळपासूनच पोलिस अधीक्षक कार्यालयात गजबजलेले दिसले.

यशस्वी वर्षपूर्तीनिमित्त जिल्ह्यातील पोलिस अधिकारी समाजाच्या वेगवेगळ्या घटकातील मान्यवर, महिला यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.